# हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय, चाळीसगाव


## गुरूकुल ट्रस्ट विश्वस्त मंडळ

| अ.क्र. | विश्वस्तांची नांवे | पद |
|---|---|---|
| १. | प्रा.श्री.लक्ष्मीकांत विष्णू पाठक | अध्यक्ष |
| २. | डॉ.श्री.हरिश रमाकांत दवे | विश्वस्त |
| ३. | श्री.घन:श्याम अनंत सामंत | विश्वस्त |
| ४. | डॉ.श्री.प्रसाद शंकर पाठक | विश्वस्त |
| ५. | सी.ए.श्री.विवेक वसंतराव काटदरे | विश्वस्त |


## शाळा समिती सन-२०२५-२६

| अ.क्र. | पदाधिकाऱ्यांची नांवे | पद |
|---|---|---|
| १. | प्रा.डॉ.श्री.राहुल अनंत कुलकर्णी | चेअरमन |
| २. | श्रीमती सुनीता सुनील घाटे | सदस्य |
| ३. | श्री.आदित्य अजितकुमार घाटे | सदस्य |
| ४. | श्री.भूषण लक्ष्मीकांत पाठक | सदस्य |
| ५. | श्री.दिपक वसंतराव देशपांडे | सदस्य |
| ६. | सौ. संगीता प्रमोद सपकाळे | मुख्या.व सचिव |
| ७. | श्री.मनोज अशोक सूर्यवंशी | शिक्षक प्रतिनिधी |

## * शिक्षक व शिक्षकेतर वृंद *

| अ.क्र. | नांव | पदनाम | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | सौ. संगीता प्रमोद सपकाळे | (मुख्याध्यापक) | एस. एस. सी., डी. एड्. |
| २. | श्री. मनोज अशोक सूर्यवंशी | (उपशिक्षक) | एच. एस. सी., डी. एड्. बी. ए. |
| ३. | श्रीमती गायत्री साहेबराव पगार | (उपशिक्षक) | बी. ए., डी. एड्. |
| ४. | श्री. विनय प्रदीप पाटील | (उपशिक्षक) | बी. ए., डी. एड्. |
| ५. | सौ. ऋतिका अनंत कापरे | (उपशिक्षक) | एम. कॉम., एम. ए. बी. एड्. |
| ६. | श्रीमती सोनाली यशवंत देशमुख | (उपशिक्षक) | बी.ए., डी. एड्. |
| ७. | श्री. स्वप्नील नामदेव गोत्रे | (उपशिक्षक) | डी.एड्., बी.ए., एम.ए., बी.एड्. |
| ८. | सौ. राजश्री नितीन शेटे | (कलाशिक्षक) | बी. कॉम. ए. टी. डी. |
| ९. | सौ. कीर्ती देवेंद्र वैद्य | (उपशिक्षक) | एच.एस.सी., डी.एड्./ बी.ए. |
| १०. | सौ. सायली म. राठोड | (उपशिक्षक) | एम.एस्सी., बी.एड्. |
| ११. | सौ. पूजा महेश काटे | (कलाशिक्षक) | ए.टी.डी.,सी.टी.सी.,एम.ए. |
| १२. | सौ. कल्पना किरण देशमुख | (उपशिक्षक) | एम.ए., बी.एड्. |
| १३. | सौ. रागिनी चेतन लोखंडे | (उपशिक्षक) | एम.एस्सी |
| १४. | सौ. प्रिया योगेश चौक | (लिपिक) | बी.ए. |
| १५. | श्री. प्रसाद चिंतामण नाईक | (शिपाई) | एच.एस.सी. |
| १६. | सौ. कविता नितीन शिंदे | (शिपाई) | एच.एस.सी |
| १७. | श्री. ललित देविदास आगोणे | (शिपाई) | एच.एस.सी. |
| १८. | श्री. पवन बाळासाहेब आगोणे | (शिपाई) | एच.एस.सी. |
| १९. | श्री. विकी संतोष देवरे | (शिपाई) | बी.ए. |

# विद्यार्थ्यांशी संवाद

प्रिय विद्यार्थी व सुजाण पालकवर्ग,

हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालयाच्या गुजगोष्टी या वार्षिक अंकाच्या निमित्ताने आपण सर्वांशी संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा, कल्पकतेचा आणि विविध गुणांचा सुंदर आविष्कार म्हणजे हा वार्षिक अंक होय. विद्यार्थ्यांच्या मनातील विचार, कल्पना, अनुभव आणि स्वप्ने शब्दरूपाने व चित्ररूपाने व्यक्त होण्याचे हे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

आजच्या बदलत्या युगात शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित राहिलेले नाही. क्रीडा, विज्ञान, सांस्कृतिक कार्यक्रम, पर्यावरण संवर्धन, सामाजिक जाणीव आणि तंत्रज्ञानाचा उपयोग या सर्व गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणे ही आपल्या शाळेची भूमिका आहे. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (AT), डिजिटल शिक्षण, संगणक साक्षरता यांसारख्या आधुनिक संकल्पनांची ओळख विद्यार्थ्यांना करून देत भविष्यकालीन कौशल्ये विकसित करण्याचा प्रयत्न विद्यालयात सातत्याने केला जात आहे.

या सर्व उपक्रमांच्या यशामागे आपल्या संस्थेचे दूरदृष्टी असलेले मार्गदर्शन, मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांचे समर्पित कार्य, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि पालकांचा विश्वास व सहभाग हे महत्त्वाचे घटक आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे केलेले प्रयत्नच आपल्या विद्यालयाची खरी ताकद आहेत.

'गुजगोष्टी' या अंकामधील लेख, कविता, कला, कथा, चित्रे, खेळ आणि विविध उपक्रमांची झलक पाहताना आपल्या विद्यार्थ्यांमधील सुप्त प्रतिभेची जाणीव निश्चितच होईल. या अंकाद्वारे विद्यार्थ्यांना स्वतःला व्यक्त करण्याची प्रेरणा मिळेल आणि भविष्यातही अधिक जोमाने सर्जनशीलतेकडे वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, असा मला विश्वास आहे.

या वार्षिक अंकाच्या निर्मितीसाठी परिश्रम घेतलेल्या सर्व विद्यार्थी, शिक्षक व संपादक मंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन. भविष्यातही हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय ज्ञान, संस्कार आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया अधिक भक्कम करीत राहील, हीच अपेक्षा. सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा....!

**– प्रा.डॉ.श्री.राहुल अनंत कुळकर्णी**
**चेअरमन – हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय,चाळीसगाव**

## मुख्याध्यापकांचे मनोगत.....

# संस्कार, शिक्षण आणि राष्ट्रप्रेमाची वाटचाल

प्रिय विद्यार्थी, पालकवर्ग, शिक्षकवृंद आणि शाळेचे हितचिंतक,

सप्रेम नमस्कार !

गुरुकुल ट्रस्ट संचलित, हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालयाचा वार्षिक विशेषांक 'गुजगोष्टी' आपल्या सर्वांच्या हातात पाहून मला अत्यंत आनंद आणि समाधानाची अनुभूती होत आहे.

शाळा म्हणजे केवळ इमारत नसते; ती स्वप्नांची कार्यशाळा असते. येथे प्रत्येक विद्यार्थी हे एक उमलते फूल आहे आणि प्रत्येक शिक्षक हा त्या फुलाला योग्य दिशा देणारा माळी आहे. वर्षभर राबविण्यात आलेल्या शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामाजिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहिलो आहोत. त्या प्रयत्नांची साक्ष म्हणजे हा विशेषांक.

यावर्षी आपण अभिमानाने स्मरण करीत आहोत – वंदे मातरम् या प्रेरणादायी गीताच्या १५० वर्षांचा गौरव! हे गीत आपल्या राष्ट्रप्रेमाची, संस्कृतीची आणि मातृभूमीबद्दलच्या कृतज्ञतेची जाणीव करून देते. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये देशभक्तीची भावना दृढ व्हावी, भारतीय संस्कृतीचा अभिमान वाढावा आणि मूल्याधारित शिक्षणाची बीजे रोवली जावीत, हा आमचा ध्यास आहे.

गुजगोष्टी या विशेषांकातून उत्कृष्ट,आदर्श विद्यार्थी, विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थी, वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाची छटा आपणास अनुभवता येईल. प्रत्येक पान ही जिद्दीची, कष्टाची आणि यशाची कहाणी सांगते आहे अशी प्रचिती येईल यात शंका नाही.

आजच्या वेगवान युगात तंत्रज्ञानासोबत संस्कारांची जोड आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ गुणवान नव्हे, तर गुणसंपन्न व्यक्तिमत्त्व म्हणून घडावे, हीच आमची अपेक्षा आहे. शिक्षण, शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रप्रेम या चार स्तंभांवर उभी असलेली ही शाळा भविष्यातही प्रगतीची नवी शिखरे गाठेल, असा मला विश्वास आहे.

या विशेषांकाच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार. आपल्या सहकार्यामुळेच शाळेचा नावलौकिक अधिक वृद्धिंगत होत आहे. सर्व मिळून ज्ञानदीप प्रज्वलित ठेवूया, संस्कारांची परंपरा जपूया आणि उज्ज्वल भविष्याच्या दिशेने ठाम पावले टाकूया.

आपल्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा !

धन्यवाद !

**सौ. संगीता प्रमोद सपकाळे**

**मुख्याध्यापक,हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय**

## संपादकीय...

# गुजगोष्टी – आठवणी, अनुभव आणि प्रगतीचा दरवळणारा सुगंध

प्रिय विद्यार्थी, पालकवर्ग आणि मान्यवर वाचक हो,

अत्यंत आनंद आणि अभिमानाच्या भावनेने आपल्या सर्वांच्या हातात गुरुकुल ट्रस्ट संचलित, हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालयाचा वार्षिक विशेषांक 'गुजगोष्टी' सुपूर्द करत आहे.
गुजगोष्टी हा केवळ एक वार्षिक अंक नाही; तर तो आपल्या शाळेच्या वर्षभराच्या कर्तृत्वाची, जिद्दीची, परिश्रमांची आणि आनंदमयी क्षणांची जपलेली स्मृती आहे. प्रत्येक पानावर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणांचे, पालकांच्या विश्वासाची छाया आणि शिक्षकांची सेवावृत्ती उमटलेली आहे.
शिक्षण ही केवळ पुस्तकी ज्ञानाची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याचा अखंड प्रवास आहे. या प्रवासात आमच्या शाळेने विविध शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्या प्रत्येक उपक्रमाचा लेखाजोखा या विशेषांकातून आपणास अनुभवता येईल.

या वर्षी विशेषत्वाने आम्ही विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यातील वक्तृत्व, गोष्टी सांगण्याची कला, विविध कलाकुसरच्या कृती आणि चित्रकला या माध्यमातून त्यांच्या कल्पनाशक्तीचा सुंदर आविष्कार शोधण्याचा , वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. विविध विषयांवरील शालेय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट ठरलेले विद्यार्थी, उत्कृष्ट पुरस्कार प्राप्त विद्यार्थी, आदर्श विद्यार्थी पुरस्कार प्राप्त तसेच वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करून आम्ही 'ज्ञानदान' हीच सर्वोत्तम भेट हा संदेशही अधोरेखित केलेला आहे.
शाळेचे चेअरमन, मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेषांकाची निर्मिती झाली आहे. त्यांच्या प्रेरणेमुळेच हा अंक अधिक दर्जेदार आणि समृद्ध झाला आहे. या अंकाच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार.
गुजगोष्टी हा विशेषांक आपल्या शाळेच्या प्रगतीचा आरसा आहे आणि आगामी वर्षासाठी प्रेरणेचा दीपस्तंभही आहे. या अंकातील प्रत्येक पान, प्रत्येक छायाचित्र आणि प्रत्येक अनुभव आपल्याला नव्या उमेदीनं पुढे जाण्यास प्रेरित करेल, अशी खात्री आहे.

आपल्या सूचना, अभिप्राय आणि सहकार्य यांची आम्ही नेहमीच अपेक्षा ठेवतो. ज्ञान, संस्कार आणि मूल्यांची परंपरा पुढे नेत आपल्या शाळेचा नावलौकिक अधिकाधिक वृद्धिंगत करूया. आपला विश्वास आणि अनमोल सहकार्य हेच आमचे खरे बळ आहे. विशेषांक बाबत आपल्या अनमोल प्रतिक्रिया नक्की कळवा. धन्यवाद!

**श्री. मनोज अशोक सूर्यवंशी**
**संपादकीय प्रमुख, हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय चाळीसगाव**

।। विद्या विनयेन शोभते ।।

# हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय, चाळीसगाव

## * शैक्षणिक वर्ष - २०२५-२६ *

## - सुभाषित -

*** आरोग्यं परमं भाग्यं स्वास्थ्यं सर्वार्थसाधनम्।**

**अर्थः आरोग्य हे सर्वात मोठे भाग्य आहे आणि चांगले आरोग्य हे सर्व उद्दिष्टांना साध्य करण्याचे साधन आहे. त्यामुळे आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी.**

*** शालेय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये इ.१ ली ते इ.६ वीतील उत्कृष्ट विद्यार्थी**

### १) * कै. पुष्पाताई जोशी शिष्यवृत्ती प्राप्त मानकरी विद्यार्थी :

| | | | |
|---|---|---|---|
| इ. १ ली ब | कु. मायरा योगेश चौधरी | इ. ४ थी अ | कु. त्रिशा योगेश सोनार |
| इ. २ री अ | कु. धनिष्ठा गुलाबराव पाटील | इ. ५ वी | चि. तेजस तोताराम सोनवणे |
| इ. ३ री अ | कु. स्वानंदी महेश सैंदाणे | इ. ६ वी | कु. रुपाली सुनील नाईक |

### २) * २०२४-२०२५ पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (५वी) पात्र विद्यार्थी :

कु. कादंबरी शरद पाटील - ५ वा क्रमांक
कु. काव्या पंकज पाटील - ६ वा क्रमांक
चि. तेजस निलेश देसले - ११ वा क्रमांक
चि. राघव किरणसिंग पवार - १८ वा क्रमांक

### ३) * अभंग स्पर्धेत प्रथम आलेले विद्यार्थी :

| | | | |
|---|---|---|---|
| इ. १ ली अ | कु. पर्णवी हर्षल पाटील | इ. १ ली ब | कु. मायरा योगेश चौधरी |
| इ. २ री अ | कु. धनिष्ठा गुलाबराव पाटील | इ. २ री ब | कु. काश्वी अतुल भोकरे |
| इ. ३ री अ | कु. भार्गवी शरद पाटील | इ. ३ री ब | कु. तनिष्का निलेश गायके |
| इ. ४ थी अ | चि. रिषभ मुकेश चौधरी | इ. ४ थी ब | कु. समृद्धी आचल परदेशी |
| इ. ५ वी | चि. अपूर्व नितीन शेटे | इ. ६ वी | कु. दिव्या विलास देवरे |

### ४) * स्मरणशक्ती स्पर्धेत प्रथम आलेले विद्यार्थी :

| | | | |
|---|---|---|---|
| इ. १ ली अ | कु. पर्णवी हर्षल पाटील | इ. १ ली ब | चि. रुद्र अमोल चव्हाण |
| इ. २ री अ | कु. भूमिका गणेश अग्रवाल | इ. २ री ब | कु. केतकी सुदाम महाजन |
| इ. ३ री अ | कु. अवनी स्वप्नील पाटील | इ. ३ री ब | कु.श्रद्धा गोकुळ जाधव,चि.कुबेर राहुल सोनार |
| इ. ४ थी अ | कु. प्रणिती पंकज चित्ते | इ. ४ थी ब | चि. संकेत संदीप सोनवणे |
| इ. ५ वी | चि. संकेत गजानन बागुल | इ. ६ वी | कु. दिव्या विलास देवरे |

## ५) ※ शालेय कथाकथन स्पर्धेत प्रथम आलेले विद्यार्थी :

| | | | |
|---|---|---|---|
| इ. १ ली अ | चि. वेदांत विलास देवरे | इ. १ ली ब | चि. निर्मल योगेश पाटील |
| इ. २ री अ | कु. हंसिका सागर सोमवंशी | इ. २ री ब | चि. अकुंर अनंत कापरे |
| इ. ३ री अ | कु. भार्गवी शरद पाटील | इ. ३ री ब | चि. श्रेयस भरत पाटील |
| इ. ४ थी अ | चि . श्रेयश शशांक अहिरे | इ. ४ थी ब | कु. संस्कृती वैभव अमृतकार |
| इ. ५ वी | कु. अनन्या कुणाल कुमावत | इ. ६ वी | कु. रुपाली सुनील नाईक |

## ६) ※ शालेय पाठांतर स्पर्धेत प्रथम आलेले विद्यार्थी :

| | | | |
|---|---|---|---|
| इ. १ ली अ | कु. भूमिका देवेंद्र पाटील | इ. १ ली ब | कु. अक्षरा आनंद शितोळे |
| इ. २ री अ | कु. परी प्रविण येवले | इ. २ री ब | कु. राजवी अविनाश पाटील |
| इ. ३ री अ | कु.भार्गवी शरद पाटील/चि.कणव गणेश घोरपडे | इ. ३ री ब | चि. श्रेयस भरत पाटील |
| इ. ४ थी अ | कु. अक्षरा गोरख कुमावत | इ. ४ थी ब | कु. आश्लेषा नितीन सोनवणे |
| इ. ५ वी | कु.नेहा समाधान पाटील/चि.अपूर्व नितीन शेटे | इ. ६ वी | कु. दिव्या विलास देवरे |

## ७) ※ शालेय गीतगायन स्पर्धेत प्रथम आलेले विद्यार्थी :

| | | | |
|---|---|---|---|
| इ. १ ली अ | चि. वेदांत विलास देवरे | इ. १ ली ब | कु. मायरा योगेश चौधरी |
| इ. २ री अ | कु. परी प्रविण येवले | इ. २ री ब | कु. वेदांगी भूषण बोरसे |
| इ. ३ री अ | चि. श्रेजल भूषण वारुळे | इ. ३ री ब | कु. तनिष्का निलेश गायके |
| इ. ४ थी अ | चि. रिषभ मुकेश चौधरी | इ. ४ थी ब | कु. आश्लेषा नितीन सोनवणे |
| इ. ५ वी | चि. सर्वज्ञ संदीप पाटील | इ. ६ वी | कु. दिव्या विलास देवरे |

## ८) ※ शालेय रांगोळी स्पर्धेत प्रथम आलेले विद्यार्थी :

| | | | |
|---|---|---|---|
| इ. १ ली अ | कु. मृणाल लक्ष्मण गवळी | इ. १ ली ब | चि. ईशान राहुल सोनवणे |
| इ. २ री अ | कु. परी प्रविण येवले | इ. २ री ब | कु. काश्वी अतुल भोकरे |
| इ. ३ री अ | चि. अथर्व अभिजीत शिसोदे | इ. ३ री ब | कु. हर्षदा सुनील पाटील |
| इ. ४ थी अ | कु. त्रिशा योगेश सोनार | इ. ४ थी ब | चि. उज्वल किरण लोहार |
| इ. ५ वी | चि. मनिष स्वप्नील गढरी | इ. ६ वी | कु. दिव्या विलास देवरे |

## ९) ※ मराठी हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम आलेले विद्यार्थी :

| | | | |
|---|---|---|---|
| इ. १ ली अ – | कु. चैताली मनोज राठोड | इ. १ ली ब – | कु. शिवण्या नकुल भवर |
| इ. २ री अ – | कु. परी प्रविण येवले | इ. २ री ब – | कु. राजवी अविनाश पाटील |
| इ. ३ री अ – | कु. स्वानंदी महेश सैंदाणे | इ. ३ री ब – | चि. रुद्र अनिकेत पाटील |
| इ. ४ थी अ – | चि. प्रथमेश पराग बढे | इ. ४ थी ब – | कु. नमस्वी प्रदीप साळुंखे |
| इ. ५ वी – | चि. मनिष स्वप्नील गढरी | इ. ६ वी | कु. तनिष्का धनंजय राजपूत |

**१०) ✻ इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धे प्रथम आलेले विद्यार्थी :**

इ. ४ थी अ – कु. त्रिशा योगेश सोनार    इ. ४ थी ब – कु. नमस्वी प्रदीप साळुंखे
इ. ५ वी – कु. दूर्वा अनंत कापरे    इ. ६ वी कु. काव्या प्रविण सोनार

**११) ✻ शालेय निबंध स्पर्धेत प्रथम आलेले विद्यार्थी :**

इ. ३ री अ – चि. शिवप्रसाद पंकज देसले    इ. ३ री ब – चि. रुद्र अनिकेत पाटील
इ. ४ थी अ – चि. अभिज्ञ सुनिल पाटील    इ. ४ थी ब – कु. संस्कृती वैभव अमृतकार
इ. ५ वी कु. सेजल मंगेश जाधव    इ. ६ वी चि. अथर्व पुरुषोत्तम निकम

**१२) ✻ प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम आलेले विद्यार्थी :**

इ. ३ री अ – चि. कणव गणेश घोरपडे    इ. ३ री ब – चि. श्रेयस भरत पाटील
इ. ४ थी अ – कु. अक्षरा गोरख कुमावत    इ. ४ थी ब – कु. आश्लेषा नितीन सोनवणे
इ. ५ वी चि. संकेत गजानन बागुल    इ. ६ वी चि. वैदिक हंसराज अहिरराव



**कु.दिव्या विलास देवरे**
**(आदर्श विद्यार्थीनी)**



**कु. वैदेही प्रशांत अहिरराव**
**(आदर्श विद्यार्थीनी)**



**चि. अथर्व अभिजीत शिसोदे**
**(उत्कृष्ट विद्यार्थी)**



**चि.रुद्र अनिकेत पाटील**
(शाळेत सर्वात जास्त हजर विद्यार्थी)



**कु.हेतल गणेश अग्रवाल**
(शाळेत सर्वात जास्त हजर विद्यार्थीनी)

# गुरुकुल ट्रस्ट चाळीसगाव संचलित, हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय
# शैक्षणिक वर्ष : २०२५ - २०२६ - शालेय कार्यक्रम, स्पर्धा नोंद

**जून २०२५**

- दिनांक ०९ - रोजी सौ. शितल देशपांडे आणि सौ. वैशाली कुलकर्णी (३ मे आणि ४ मे) रोजी जालना येथे झालेल्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या चर्चासत्रात उपस्थित.
- दिनांक १० - आणि दिनांक ११ - रोजी श्री. नचिकेत नित्सुरे (ज्ञान प्रबोधिनी, पुणे) यांची प्रकल्प प्रक्रिया व मूल्यमापन या विषयावर गुरुकुल परिवाराच्या शिक्षक वृंद यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली.
- दिनांक १२ - रोजी संस्थेने सर्व गुरुकुल परिवारासाठी '**संवाद मेळावा**' आयोजित केला होता. यामध्ये संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. श्री. बापूसाहेब पाठक यांनी संस्थेचे ध्येय आणि दृष्टिकोन बाबत सविस्तर माहिती दिली. सोबतच संस्थेच्या वेबसाइटचे अनावरण करण्यात आले.
- दिनांक १६ - शाळेचा पहिला दिवस '**शाळा प्रवेशोत्सव दिन**' म्हणून साजरा केला. यानिमित्त प्रवेशद्वारावर फुग्यांची कमान उभारण्यात आली होती.पहिलीत दाखल झालेल्या नवागतांचे, इतर वर्गातील उपस्थित विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पवृष्टी सह स्वागत करण्यात आले. हसरे इमोजी स्टिकर भेट देण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट उभारण्यात आला.
- दिनांक २१ - संस्थेकडून भव्य आंतरराष्ट्रीय योग महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे चाळीसगाव नगरीचे लोकप्रिय आमदार मा. श्री. मंगेशदादा चव्हाण होते. सोबतच बापजी रुग्णालयाचे संचालक मंडळ उपस्थित होते. बालवाडी, प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध शारीरिक हालचाली, शास्त्रोक्त सूर्यनमस्कार, विविध आसनांचे प्रात्यक्षिक करून दाखवत उपस्थितांची मने जिंकली. प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक नियोजन पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.
- दिनांक २८ - रोजी शैक्षणिक वर्षाचे नियोजन व विद्यार्थी प्रगती आढावा यासाठी वर्गवार पालक सभा घेण्यात आली होती.

**जुलै २०२५**

- दिनांक ६ (रविवार) - आषाढी एकादशीला गुरुकुल दिंडी मिरवणूक सोहळा पार पडला. विठू नामाच्या जयघोषा सोबत समाज जागृतीची भावना निर्माण होण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता,देशभक्ती, पर्यावरण, संवर्धन, भ्रष्टाचार निर्मुलन इ.विषयांचे घोषफलक झळकत होते.श्री. पटेल बंधू यांचेकडून शेंगदाणा चिकी आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली होती. रिंगण सोहळ्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.चाळीसगाव वनविभागा मार्फत विद्यार्थ्यांना विविध रोपांचे वाटप करण्यात आले.
- दिनांक ९ - रोजी विद्यार्थ्यांसाठी '**वर्षारंभ**' कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे महत्व, स्वरूप,

नियोजनाची जबाबदारी शिक्षिका श्रीमती. सोनाली देशमुख व शिक्षक श्री. स्वप्नील गोत्रे यांनी पार पाडली होती. विद्यार्थ्यांनी आपले संकल्प जाहीर केले.

- दिनांक १० – रोजी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला होता. माता पालक सौ. प्रतिभा शुरकर यांनी **'आईची थोरवी'** आणि कु. ममता महाजन यांनी **'गुरुंचे महत्व'** या विषयांवर माहिती सांगितली. पहिलीतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती भावनांचे प्रकटीकरण ठसे उमटवून दर्शवले होते.निवडक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून, शुभेच्छा कार्ड भेट देऊन शिक्षकांच्या लकबी (नकला) करून आदरभाव दर्शवला होता.
- दिनांक ११ – रोजी अभंग स्पर्धा पार पडली होती. इयत्तेनुसार संत ठरवून देण्यात आलेले होते. विद्यार्थ्यांनी त्या संतांच्या रचना अतिशय सुंदर रितीने तालासुरात गायन करून सादर केल्या होत्या.स्पर्धेचे परिक्षण ह.भ.प.सौ.सुनीतावाई पाटील (टाकळी प्र.दे.) यांनी केले होते.
- जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत (२०२४–२५) उत्तीर्ण होऊन १) कु. कादंबरी शरद पाटील व २) चि. राघव किरणसिंग पवार यांची निवड झाली होती.
- दिनांक १८– रोजी सर्वसाधारण पालक सभेचे आयोजन करून या शैक्षणिक वर्षासाठी माता पालक समिती आणि शिक्षक – पालक संघ कार्यकारिणी निवडण्यात आली होती. यावेळी संस्थेचे ध्येय,उद्दिष्टे याबद्दल माहिती देण्यात आली. सोबतच संस्थेचे भविष्यातील नियोजन कोणते आणि कसे असेल याबद्दल माहिती देण्यात आली.

**ऑगस्ट २०२५**

- दिनांक ०५ – रोजी तिसरी ते सहावी च्या विद्यार्थ्यांसाठी शालेय निबंध स्पर्धा घेण्यात आली होती.
- दिनांक ०६ ते ०८ – दरम्यान इयत्ता दुसरी ते सहावी च्या विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी (PAT) घेण्यात आली होती.
- दिनांक ०८, शुक्रवार –रोजी पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांनी स्व कल्पकतेने सुंदर राखी बनवून त्यांचे राखी प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन पालक संघाचे उपाध्यक्ष श्री. सुनील पाटील यांचे हस्ते सपत्नीक करण्यात आले.
- दिनांक १४, गुरुवार – रोजी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्त शतकोत्तर (७५०) सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष निमित्त शाळेत सामूहिक पसायदान पठण करण्यात आले.
- दिनांक १६, शनिवार – हा दिवस विद्यालयासाठी अविस्मरणीय ठरला. श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या निमित्ताने शाळेचा प्रत्येक कानाकोपरा गोविंदा आला रे आला या घोषणांनी दुमदुमला. श्रीकृष्णाच्या बाललीलांचे दर्शन जणू प्रत्यक्षच घडावे,असा अनुभव या सोहळ्याने दिला.
- पाचवी–सहावीच्या विद्यार्थीनींनी मनोहारी नृत्यरचना सादर केली. तर सौ.प्रिया चौक यांच्या मधुर

आवाजातील गवळण गायनाने वातावरण भक्तिरसाने भरून गेले. यावेळी माता-पालक समिती सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला.

- लहानग्या गोविंदांनी एकजूटीच्या बळावर तीन थरांचा मानवी पिरॅमिड रचत दहीहंडी फोडली. कार्यक्रमानंतर प्रसादरुपी काल्याचे वाटप करण्यात आले. गोविंदा पथकाच्या उत्साहाला बळ देण्यासाठी सौ.सोनम गणेश अग्रवाल यांनी १०१/- रुपयांची भेट अर्पण केली.
- दिनांक १८ ते २० - दरम्यान पहिली घटक चाचणी पार पडली.
- रामकृष्ण विवेकानंद सेवा संस्था,चाळीसगाव आयोजित तालुकास्तरीय चित्रकला रंगभरण स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत २५४ विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व सहभाग नोंदवला होता. सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक व सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले होते.
- दिनांक २१ - रोजी बैलपोळा सण शाळेत प्रत्यक्ष सजवलेला बैल आणून साजरा केला होता. बैलाला पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घालण्यात आला. बैलासोबत विद्यार्थ्यांनी फोटो काढून आपला आनंद व्यक्त केला.
- दिनांक २१ - रोजी पाचवी, सहावी च्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक शाडू माती पासून गणपती मूर्ती बनवणे कार्यशाळा घेण्यात आली होती. कार्यशाळेत कलाशिक्षक सौ. पूजा काटे व सौ. राजश्री शेटे यांनी मार्गदर्शन केले. इनरव्हिल क्लब ऑफ चाळीसगाव मिल्कसिटी यांचेकडून विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. प्रथम क्रमांक कु. जान्हवी प्रकाश पाटील(६ वी), दुसरा क्रमांक कु. स्नेहल समाधान पाटील(६ वी) तिसरा क्रमांक चि. रणवीर प्रविण संगेले (५ वी) यांनी पटकावला होता.
- दिनांक २७ - रोजी श्रीगणेश चतुर्थी निमित्त शाळेत दरवर्षी प्रमाणे पर्यावरणपूरक शाडू माती पासून बनवलेल्या गणपती बाप्पांची (गुरुकुलच्या राजाची) सवाद्य आगमन मिरवणूक शहरातील प्रमुख रस्त्याने सजवलेल्या बैलगाडीवर काढण्यात आली. यावेळी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे ढोल ताशा पथकाच्या साथीने लेझिम खेळत, नाचत गाजत मिरवणूक सोहळा पार पडला. श्रींची स्थापना सौ. व श्री. चेतन चव्हाण यांच्या शुभहस्ते विधीवतरित्या करण्यात आली. यावर्षी उत्सवाची संकल्पना ही ऑपरेशन सिंदूर व श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती आणि जगतगुरु संत तुकाराम महाराज यांचे त्रिशतकोत्तर सदेह वैकुंठ गमन जयंती वर्ष यावर आधारित होती.ही संकल्पना शौर्याचा आणि भक्तीचा गौरव करणारी होती. स्थापनेला आणि विसर्जनाला गुरुकुल परिवारातील सर्व सदस्यांनी घरून मोदकाचा प्रसाद तयार करून आणला होता.
- यावर्षीच्या श्रीगणेश उत्सव निमित्ताने इयत्तेनुसार स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

  पहिली (अ/ब) - गणपती बाप्पांचे चित्र रंगवणे

दुसरी (अ/ब) – कापसापासून सुंदर वाती तयार करणे.

तिसरी (अ/ब) – पानफुलांपासून गणपती बाप्पांची प्रतिमा तयार करणे.

चौथी (अ/ब) – श्री गणपती बाप्पांचे जीवनावर आधारित विशेष प्रश्नमंजुषा स्पर्धा

पाचवी, सहावी – विविध पाने फुले यांपासून फुलमाळ बनवणे स्पर्धा घेतली.

या स्पर्धेत विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना उत्सव कालावधीतच बक्षीस देण्यात आले होते. ज्या दिवशी ज्या वर्गांची स्पर्धा त्या दिवशी त्या विद्यार्थ्यांना श्री गणपती बाप्पांची आरती करण्याचा मान देण्यात आला होता.

**सप्टेंबर २०२५**

- दिनांक ०६ – रोजी अनंत चतुर्दशीला गणपती बाप्पांच्या पार्थिव मूर्तीची सवाद्य मिरवणूक काढून पर्यावरणपूरक पद्धतीने एका सजवलेल्या टब मध्ये विसर्जन करण्यात आले.
- दिनांक ०९ – रोजी शालेय स्मरणशक्ती स्पर्धा घेण्यात आली. यात दैनंदिन जीवनातील परिचयाच्या वस्तू मांडण्यात आल्या होत्या. ठराविक वेळ देऊन निरीक्षण करून दिलेल्या वेळेत लिहायच्या होत्या. याद्वारे स्मरण, निरीक्षणशक्ती व लेखन गती पडताळण्यात आली.
- दिनांक १२ – (भाद्रपद शु.सप्तमी) रोजी श्री ज्ञानेश्वरी जयंती साजरी करण्यात आली होती. यानिमित्ताने सर्व विद्यार्थ्यांना शाळेकडून हरिपाठ पुस्तक भेट देण्यात आले.
- दिनांक १६ – रोजी शालेय पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. यात पहिलीसाठी – पाढे, दुसरीसाठी – पसायदान,तिसरीसाठी – हरिपाठ अभंग, चौथीसाठी – पर्यावरणावरील परिच्छेद, पाचवीसाठी – श्रीगणेश स्तोत्र,सहावीसाठी – स्वामी विवेकानंदांवरील परिच्छेद पाठांतरासाठी देण्यात आले होते. या स्पर्धेचे परीक्षण सौ.अश्विनी देविदास शिंत्रे (सदस्य–पालक शिक्षक संघ) यांनी केले होते.
- स्व. बाबासाहेब के. नारखेडे स्मृतीदिन निमित्त तु. स. झोपे गुरुजी प्राथमिक विद्या मंदिर, भुसावळ आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत कु. संस्कृती वैभव अमृतकार (इ.४ थी – ब ) हिला उत्तेजनार्थ रोख रु.५००/– पारितोषिक मिळाले.
- विद्यार्थ्यांना **'वाद्य परिचय'** उपक्रमाअंतर्गत बासरी, शंकू, डमरू, डफ, मृदंग, यांची ओळख व माहिती करून देण्यात आली. संगीत शिक्षक श्री. तुषार मुजुमदार यांनी सर्व वाद्यांची माहिती प्रत्यक्ष वाद्य वाजवून करून दिली.
- मा. संस्थेच्या पुढाकाराने सर्व शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तंत्रस्नेही व्हावे.डिजिटल मार्केटिंग माध्यमातून सर्व स्तरापर्यंत पोहचावे यासाठी कु. गौरी राहुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.
- रामकृष्ण विवेकानंद सेवा संस्था आश्रम चाळीसगाव यांनी आयोजित केलेल्या तालुकास्तरीय

चित्रकला रंगभरण स्पर्धेत कु. संस्कृती वैभव अमृतकार (इ.४ थी – ब) हिचा द्वितीय क्रमांक आला.

- नवरात्रोत्सवानिमित्त सर्व विद्यार्थ्यांकडून देवींचे मुखवटे रंगभरण उपक्रम राबविण्यात आला.

**ऑक्टोबर २०२५**

- दिवाळी निमित्ताने विद्यार्थ्यांकडून आकर्षक आकाशकंदील बनवून घेण्यात आले. वर्गवार विद्यार्थ्यांकडून मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतून दिवाळी शुभेच्छा कार्ड तयार करून घेतले.
- दिनांक ०९ ते १५ ऑक्टोबर – दरम्यान प्रथम सत्र परीक्षा घेण्यात आली.
- दिनांक १६ – रोजी शाळेत दिवाळी उत्सव साजरा करण्यात आला. सर्व शिक्षकांनी दिवाळीतील प्रत्येक खास सणाची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी बनवलेले शुभेच्छा कार्ड यावेळी भेट देण्यात आले.
- दिनांक १७ – रोजी **'दिवाळी पहाट'** कार्यक्रम साजरा करण्यात आला. संगीत शिक्षक श्री. तुषार मुजुमदार, बालवाडी विभागाचे चेअरमन डॉ.श्री. प्रसाद पाठक, शिक्षिका सौ.ऋतिका अनंत कापरे, बालवाडी शिक्षिका श्रीमती मयूरी जोशी, शाळेच्या लिपीक सौ. प्रिया चौक, सेवक श्री. अनिल शिंदे यांनी बहारदार गाणी सादर करून वातावरण मंगलमय केले.
- दिनांक १७ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर पर्यंत दिवाळी सुटीचा आनंद घेण्यात आला.

**द्वितीय सत्र – नोव्हेंबर २०२५**

- दिनांक ०३ –रोजी संस्थेचे विश्वस्त प्रा.डॉ.श्री. विवेक काटदरे यांचे **'चांगले शिक्षक होऊया'** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.
- दिनांक ०४ – रोजी श्री. अमोल येवले (शिक्षक – ता.सा.माध्य.विद्यालय) यांनी **'प्रश्नर्निमिती कौशल्य'** विषयावर मार्गदर्शन दिले.
- दिनांक १७ नोव्हेंबर ते दिनांक १९ नोव्हेंबर या कालावधीत मुख्याध्यापक श्रीमती संगीता सैंदाणे व ज्येष्ठ शिक्षक श्री. मनोज अशोक सूर्यवंशी यांनी मूल्यवर्धन प्रशिक्षण पूर्ण केले.
- दिनांक २४ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर या कालावधीत शिक्षिका सौ. कीर्ती देवेंद्र वैद्य आणि सौ. कल्पना किरण देशमुख यांनी मूल्यवर्धन प्रशिक्षण पूर्ण केले.
- दिनांक २७ नोव्हेंबर ते दिनांक २९ नोव्हेंबर या कालावधीत शिक्षिका सौ. सायली राठोड व सौ.रागिणी चेतन लोखंडे यांनी मूल्यवर्धन प्रशिक्षण पूर्ण केले.
- दिनांक २१ व २२ नोव्हेंबर रोजी शालेय रांगोळी स्पर्धा घेण्यात आलेली होती. यावेळेस विद्यार्थ्यांना वयोगटानुसार विषय देऊन रांगोळी रेखाटन करण्यास सांगितले गेले. अत्यंत सुंदर,सुबक अशा रांगोळीचे रेखाटन विद्यार्थ्यांनी केले.
- दिनांक २६ – रोजी शालेय मराठी व इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली.

**डिसेंबर २०२५**

- दिनांक ०९– रोजी वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. **'जागर लोकनृत्याचा'** या संकल्पनेवर आधारित हे भव्य दिव्य स्नेहसंमेलन खूप उत्साहात, जल्लोषात झाले. प्रमुख अतिथी म्हणून शाळेच्या माजी विद्यार्थीनी डॉ.सौ. रूपाली राजपूत उपस्थित होत्या. या स्नेहसंमेलनात ३२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पालकांनी या कार्यक्रमाचे खूप कौतुक करून लेखी स्वरूपात अभिप्राय दिले.
- दिनांक १८– रोजी शालेय कथाकथन स्पर्धा पार पडली.
- विज्ञान विषयाच्या शिक्षिका सौ.सायली राठोड यांनी **'छोटे सायंटिस्ट'** विषयावर २ दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण केले.
- दिनांक ३० – रोजी रामकृष्ण विवेकानंद सेवा संस्था चाळीसगाव आयोजित तालुकास्तरीय आंतरशालेय पाठांतर स्पर्धेत सहावीच्या कु. तनिष्का धनंजय राजपूत आणि कु. दिव्या विलास देवरे यांनी सहभाग नोंदवला.
- शाळेच्या कलाशिक्षिका सौ. राजश्री नितीन शेटे व सौ. पूजा महेश काटे यांनी **'लोकशाही दिवस'** आणि **'बेटी बचाव बेटी पढाव'** कार्यक्रम निमित्ताने सुंदर रांगोळी रेखाटन केले. या रांगोळीचे विशेष कौतुक श्री. विलास भोई साहेब (गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती चाळीसगाव) यांनी आवर्जून केले.

**जानेवारी २०२६**

- दिनांक ०१ जानेवारी आणि ०२ जानेवारी रोजी वार्षिक क्रीडा महोत्सव पार पडला. यात १०० मीटर धावणे,लगोरी पाडणे,बादलीत चेंडू टाकणे, पुस्तकाचा तोल सांभाळून चालणे, पोत्यात पाय टाकून उड्या मारणे , रिंग टाकणे, चेंडू गोळा करणे इत्यादी खेळ घेण्यात आले. विजेत्या विद्यार्थी खेळाडूंना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.
- दिनांक ०५ जानेवारी ते ०७ जानेवारी दरम्यान आकारिक मूल्यमापन चाचणी २ घेण्यात आली.
- दिनांक २० – रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या वतीने **'वैज्ञानिक जाणिवा शिक्षण'** प्रकल्पांतर्गत एक दिवसीय प्रशिक्षण शिक्षिका श्रीमती सोनाली यशवंत देशमुख यांनी पूर्ण केले.
- दिनांक २३ – रोजी शालेय **'गीतगायन'** स्पर्धा घेण्यात आली.
- दिनांक २६ – रोजी शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. निवडक विद्यार्थ्यांनी तीनही भाषांमध्ये मनोगत सादर केले व उपस्थितांची दाद मिळवली.
- दिनांक २८ – रोजी पुष्पाताई जोशी बालविकास मंदिर आणि हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय यांच्या वतीने **'सुजाण पालकत्व'** कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला समुपदेशक श्री.रत्नाकर शांताराम पाटील ( बाल मानसशास्त्रज्ञ, जळगाव) यांनी मार्गदर्शन केले. पालकांनी चांगला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**फेब्रुवारी २०२६**

- दिनांक ०४– रोजी शाळेत विद्यार्थ्यांसाठी **'आनंद मेळावा'** आयोजित करण्यात आला होता. यामध्ये इ. तिसरी ते सहावीच्या विद्यार्थ्यांनी खाद्य पदार्थांचे स्टॉल लावले होते.व्यवहार ज्ञानाची समज अनुभवातून यावी यासाठी हा मेळावा भरविण्यात आला.
- दिनांक १३ (शुक्रवार) – शाळेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शाळेचे चेअरमन प्रा.डॉ. राहुल अनंत कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली तर सौ.संध्या सुनील दर्प (ज्येष्ठ शिक्षिका तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालय) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या समारंभात कै. पुष्पाताई जोशी शिष्यवृत्ती, पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार,शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील प्रत्येक इयत्तेतून प्रथम आलेले विद्यार्थी, शालेय अभंग,निबंध,स्मरणशक्ती, पाठांतर, कथाकथन स्पर्धेत प्रथम आलेले विद्यार्थी, विशेष पुरस्कारांमध्ये – उपस्थिती पुरस्कार, उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार, दोन आदर्श विद्यार्थी पुरस्कार प्रदान करण्यात आले.
- दिनांक १४ – रोजी शाळेत **'मातृ पितृ दिवस'** साजरा करण्यात आला.यावेळी उपस्थित पालकांचे पाद्य पूजन मुलामुलींच्या हस्ते करून घेण्यात आले. मुलांमुलींनी आपल्या आईवडिलांना एक वचन दिले आणि पालकांनी आपल्या मुलामुलींनी एक अपेक्षा पूर्ण करावी अशी इच्छा बोलून दाखवली. हा कार्यक्रम घेतल्याबद्दल पालकांनी शाळेचे कौतुक करून आभार व्यक्त केले.
- दिनांक १९ – रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती सोहळा साजरा करण्यात आला.श्री. प्रशांत चित्ते सर (शिक्षक – ता. सा. माध्यमिक विद्यालय) यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या किल्ल्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले.
- दिनांक २१ – रोजी संस्कार भारती चाळीसगाव यांनी आयोजित केलेल्या कथाकथन स्पर्धेत ११ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.
- दिनांक २१ – रोजी 'इनरव्हील क्लब ऑफ चाळीसगाव' यांच्या वतीने **'कौटुंबिक हिंसाचार'** विषयावर पथनाट्य स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत सर्वात लहान वयोगट म्हणून सर्वच १४ विद्यार्थी मित्रांना विशेष कौतुक बक्षीस म्हणून प्रमाणपत्र आणि लेखन पॅड देण्यात आले.
- दिनांक २५ – रोजी वार्षिक हस्तकला प्रदर्शन भरविण्यात आले. शाळेचे पालक श्री. चेतन धनगर सर ( कलाशिक्षक – माध्यमिक विद्यालय, जामदा ) प्रमुख उद्घाटक म्हणून उपस्थित होते. या प्रदर्शनात कागद, कापड, माती, पुठ्ठे,रंग, टाकाऊ वस्तू यांपासून बनवलेल्या विविध कलाकृती मांडण्यात आल्या होत्या. पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन सकारात्मक अभिप्राय नोंदवला.
- दिनांक २७ – रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला होता. यानिमित्ताने शाळेत बालसभा आयोजित केली होती. यात विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा इतिहास, साहित्य, लेखक,कवी यांच्याबद्दल विचार व्यक्त केले.

- राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्त पाचवी,सहावी च्या विद्यार्थ्यांनी छोटे छोटे सायन्स मॉडेल तयार करून त्यांचा वापर, उपयोग याबद्दल माहिती करून दिली. निरीक्षण आणि प्रश्न कौशल्य विकसित करण्यासाठी कृती कार्यक्रम घेण्यात आला.
- पाचवी, सहावीच्या विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रमाचा भाग म्हणून बालसभा आयोजित करण्यात आल्या होत्या. विशेष म्हणजे संपूर्ण आयोजनाची जबाबदारी विद्यार्थ्यांनीच पार पाडली होती.

**ज्या दिवशी तुमच्यासमोर कोणतीही समस्या नसेल,**

**तेव्हा समजून जा की, तुम्ही चुकीच्या मार्गावर चालत आहात.** – ***स्वामी विवेकानंद***

## ✻ शालेय ग्रंथालय ✻

वाचन – ज्ञानाचा अखंड झरा

प्रिय विद्यार्थी व सुजाण पालक,

सप्रेम नमस्कार !

पुस्तक हे केवळ कागदाचे पान नसते, तर ते ज्ञान, संस्कार आणि अनुभव यांचे जिवंत भांडार असते. वाचनाच्या माध्यमातून विद्यार्थी केवळ माहिती मिळवत नाही, तर विचार करण्याची, समजून घेण्याची आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित करतो. म्हणूनच वाचन ही सवय प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाची ठरते.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल आणि इतर माध्यमांच्या आकर्षणात वाचनाची सवय कमी होत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करून ज्ञानाचा खरा आनंद अनुभवणे आवश्यक आहे. शाळेतील ग्रंथालय हे विद्यार्थ्यांसाठी खजिना रुपी एक शांत, समृद्ध आणि प्रेरणादायी स्थान आहे.जिथे प्रत्येक पुस्तक एक नवे विश्व उघडते.

विद्यार्थ्यांनी आपल्या महान देशाचा इतिहास, संस्कृती आणि महान व्यक्तींचे जीवन याबद्दल वाचन करून राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ करावी, ही अपेक्षा आहे. शाळेच्या वाचन उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग पाहून आनंद वाटतो. वाढदिवस निमित्त पुस्तक भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुकास्पद आहे. अशा उपक्रमांमुळे वाचनसंस्कृती अधिक बळकट होत आहे.

शाळेचा ग्रंथपाल म्हणून सांगताना अभिमान वाटतो की, या शैक्षिणक वर्षात आपल्या ग्रंथालया खालील प्रमाणे ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. यात शिक्षक ग्रंथालय विभागात ५२२ पुस्तके तर विद्यार्थी ग्रंथालय विभागात ३२१५ पुस्तके आहेत. पैकी १२८ पुस्तके विद्यार्थ्यांकडून वाढदिवस निमित्त भेट मिळाली आहेत.चला, आपण सर्व मिळून वाचनाची सवय जोपासूया, पुस्तकांना आपला सच्चा मित्र बनवूया आणि ज्ञानप्रकाशाने आपले जीवन उजळवूया.

आपल्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

'वाचाल तर वाचाल!'

**श्री. मोहन शामराव पाटील**

**ग्रंथपाल – हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय**

❋ **वाढदिवसनिमित्त पुस्तक भेट दिलेल्या विद्यार्थ्यांची नावे –** मा. संस्थेने घेतलेल्या निर्णयानुसार या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांच्या वाढदिवसाला शाळेत चॉकलेट अथवा इतर साहित्य न देता शालेय ग्रंथालयाला पुस्तक भेट द्यावे. या आव्हानाला पालकांनी उत्तम असा प्रतिसाद दिला. ज्या विद्यार्थ्यांनी शालेय ग्रंथालयास पुस्तक भेट दिलीत त्यांची नावे पुढील प्रमाणे –

१) कु. ओवी महेंद्र निकम १ ली – अ
२) चि. लव राहुल सोनार १ ली – अ
३) चि. कुश राहुल सोनार १ ली – अ
४) कु. पर्णवी हर्षल पाटील १ ली – अ
५) कु. भैरवी सतीश साळुंखे १ ली – अ
६) कु. मृणाल लक्ष्मण गवळी १ ली – अ

१) चि. निर्मल योगेश पाटील १ ली – ब
२) कु. शार्वी मयूर भोसले १ ली – ब
३) कु. अक्षरा आनंद शितोळे १ ली – ब
४) चि. क्षितिज विश्वजीत खैरनार १ ली – ब

१) कु. भूमिका गणेश अग्रवाल २ री – अ
२) चि. रणविजय श्रीपाद पाटील २ री – अ
३) कु. परी प्रविण येवले २ री – अ
४) चि. सोहम युवराज सपकाळे २ री – अ
५) कु. हंसिका सागर सोमवंशी २ री – अ
६) चि. पूर्वील राहुल बागड २ री – अ
७) कु. नेत्रा निलेश पाटील २ री – अ
८) कु. हर्षिता सुनील खैरनार २ री – अ
९) चि. कविश देवेंद्र पाटील २ री – अ
१०) कु. धनिष्ठा गुलाबराव पाटील २ री – अ
११) कु.श्रावणी समाधान गायकवाड २ री–अ

१) कु. राजवी अविनाश पाटील २ री – ब
२) कु. केतकी सुदाम महाजन २ री – ब
३) कु. हर्षिका सचिन गोरे २ री – ब
४) कु. शिवण्या संजय पाटील २ री – ब
५) चि. पार्थ गणेश पवार २ री – ब
६) चि. अंकित योगेश बोरसे २ री – ब
७) कु. काश्वी अतुल भोकरे २ री – ब

१) चि. अर्णव अरुण साबळे ३ री – अ
२) कु. त्रिशा देविदास शिंत्रे ३ री – अ
३) चि. सुयश शशांक अहिरे ३ री – अ
४) कु. श्रेजल भूषण वारुळे ३ री – अ
५) चि. अथर्व अभिजीत शिसोदे ३ री – अ
६) चि. श्रीनिधी संतोष कुलकर्णी ३ री – अ
७) चि. तेजस संतोष जाधव ३ री – अ
८) कु. प्रांजल ज्ञानेश्वर पाटील ३ री – अ
९) चि. मंथन तुषार सपकाळ ३ री – अ

१) कु. तनिष्का निलेश गायके ३ री – ब
२) चि. ओंकार दिनेश देशमुख ३ री – ब
३) चि. कुबेर राहुल सोनार ३ री – ब
४) चि. मानस नरेशकुमार सोनवणे ३ री – ब
५) चि. शंभुराज विकास पाटील ३ री – ब
६) कु. अक्षदा विशाल देवरे ३ री – ब
७) कु. यज्ञा जयभारत नागरे ३ री – ब
८) कु. स्वरा सचिन वाणी ३ री – ब
९) चि. आरव राहुल वाणी ३ री – ब
१०) चि. प्रणव विठोबा गायकवाड ३ री – ब
११) चि. तनवीर योगेश जाधव ३ री – ब
१२) चि. गोपीचंद ईश्वर राठोड ३ री – ब
१३) चि. रुद्र अनिकेत पाटील ३ री – ब

१४) कु. शिवण्या योगेश सूर्यवंशी ३ री – ब
१५) चि. लक्षित सचिन मोरे ३ री – ब

१) चि. शौर्य पंकज पाटील ४ थी – अ
२) कु. चेतना मयूर चौधरी ४ थी – अ
३) कु. तन्वी मयूर चौधरी ४ थी – अ
४) चि. अभिज्ञ सुनिल पाटील ४ थी – अ
५) कु. जीविका योगेश गुंजाळ ४ थी – अ
६) चि. जिग्नेश योगेश गुंजाळ ४ थी – अ
७) कु. रेवा गणेश राजपूत ४ थी – अ
८) चि. श्रेयश शशांक अहिरे ४ थी – अ
९) कु. श्रेया दिलीप साठे ४ थी – अ
१०) चि. हरीश पंकज महाजन ४ थी – अ
११) चि. कार्तिक प्रदिप पाटील ४ थी – अ
१२) चि. मौर्य निलेश लोहारकर ४ थी – अ
१३) चि. प्रथमेश पराग बढे ४ थी – अ
१४) चि. अर्णव धनंजय देसले ४ थी – अ
१५) कु. प्रणिती पंकज चित्ते ४ थी – अ
१६) चि. कैवल्य अविनाश रणदिवे ४ थी – अ
१७) कु. गायत्री विरेंद्रसिंग परदेशी ४ थी – अ
१८) चि. आरव विनोद सानप ४ थी – अ
१९) चि. गौरव गणेश ठाकूर ४ थी – अ
२०) चि. रिषभ मुकेश चौधरी ४ थी – अ
२१) कु. त्रिशा योगेश सोनार ४ थी – अ
२२) कु. नव्या सचिन दाभाडे ४ थी – अ
२३) चि. रिषभ अनिल काळे ४ थी – अ
२४) चि. यशोदीप मनोज वाघ ४ थी – अ
२५) कु. वैदेही प्रशांत अहिरराव ४ थी – अ
२६) चि. गुरुराज गणेश पाटील ४ थी – अ

१) कु. समृद्धी आचल परदेशी ४ थी – ब
२) चि. वेदांत चंद्रकांत कोतकर ४ थी – ब
३) कु. संस्कृती वैभव अमृतकार ४ थी – ब
४) चि. संविधान विलास चव्हाण ४ थी – ब
५) कु. आनंदी गोविंद शुक्ल ४ थी – ब
६) कु. रितिका कैलास तिवारी ४ थी – ब
७) कु. ज्ञानदा दिपक पाटील ४ ली – ब
८) कु. आश्लेषा नितीनकुमार सोनवणे ४ थी– ब
९) कु. तनिष्का अमोल गोरे ४ थी – ब

१) चि. भार्गव सचिन पवार पाचवी
२) चि. वेदांत देवेंद्र देशमुख पाचवी
३) कु. नेहा समाधान पाटील पाचवी
४) चि. सर्वज्ञ संदीप पाटील पाचवी
५) कु. सेजल मंगेश जाधव पाचवी
६) कु. हेतल गणेश अग्रवाल पाचवी
७) चि. अविष्कार मयूर भोसले पाचवी
८) चि. शिवरुद्र सतीश शिंदे पाचवी
९) चि. दूर्वा अनंत कापरे पाचवी
१०) चि. अपूर्व नितीन शेटे पाचवी
११) कु. अनन्या कुणाल कुमावत पाचवी
१२) चि. मनिष स्वप्नील गढरी पाचवी

१) कु. मानवी ज्ञानेश्वर पाटील सहावी
२) कु. दृष्टी समीर पाटील सहावी
३) चि. आराध्य भूषण भामरे सहावी
४) कु. तनिष्का धनंजय राजपूत सहावी
५) चि. वैदिक हंसराज अहिरराव सहावी
६) कु. जान्हवी प्रकाश पाटील सहावी
७) कु. दिव्या विलास देवरे सहावी
८) कु. स्नेहल समाधान पाटील सहावी

# पालकांचा अभिप्राय

शाळेत आयोजित केलेल्या जागर लोकनृत्याचा सादरीकरणाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.मुलांनी इतक्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने सादर केलेला हा नृत्य प्रकार पाहून खूप आनंद झाला. या कार्यक्रमामुळे मुलांना आपल्या मातृ संस्कृतीची ओळख झाली आणि पारंपारिक कलेबद्दल आदर निर्माण झाला. शाळेतील शिक्षकांनी अत्यंत मनापासून नृत्याची तयारी करून घेतली त्याबद्दल आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. मुलांच्या वेशभूषा, नृत्य आणि सादरीकरण अतिशय सुंदर झाले होते.अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, समूह कार्य, व्यासपीठावरील धैर्य विकसित होण्यास मदत होते. भविष्यातही शाळेने अशाच सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करावे ही अपेक्षा. कार्यक्रम अत्यंत उत्तमरीत्या पार पडला. शाळेचे प्रशासन, सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाचे मनःपूर्वक अभिनंदन !

***-पालक - सौ.रिया विक्रांत चव्हाण***

जागर लोकनृत्याचा हा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम अतिशय सुंदर व उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध समाजाच्या पारंपारिक नृत्याचा सहभाग होता. यामुळे विद्यार्थी यातून खूप काही शिकतात. विद्यार्थ्यांमध्ये व्यासपीठावर नृत्य सादर करण्याची,सूत्रसंचालन करण्याची, तसेच वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे चिमुकलेच स्वागतगीत व ईशस्तवन गायन करतात हे अधिक कौतुकास्पद आहे. स्नेहसंमेलन हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा घटक आहे. केवळ विद्यार्थ्यांच्या भौतिक विकासाचा नाही,तर शारीरिक, मानसिक, भावनिक विकास व अभिव्यक्ती सादरीकरण हे सुद्धा महत्त्वाचे आहे. कार्यक्रमाची बैठक व्यवस्था, नियोजन, वेळेचे काटेकोर पालन या सर्वांचे श्रेय आदरणीय शिक्षकांनाच जाते. आणि म्हणून एकंदरीत विचार करता आमचा शाळा निवड करण्याचा हेतू साध्य होत आहे हे लक्षात येते. So thank you respected teachers and all team

***-पालक- सौ.नूतन विश्वजीत खैरनार***

दिनांक ९ डिसेंबर रोजी घेण्यात आलेला स्नेहसंमेलन कार्यक्रम खूप सुंदर रित्या सादर झाला. खूप आनंद वाटला. कार्यक्रमाचे नियोजन खूप छान होते खरंच गेल्या एक महिन्यापासून घेण्यात येणाऱ्या तुमच्या मेहनतीचे सादरीकरण खूप छान रित्या झाले. तुम्हा सर्व शिक्षक वृंद व सेवक वर्गाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. असेच उपक्रम आपल्या शाळेत यापुढे व्हावे अशी इच्छा व्यक्त करते आणि मुलांनाही नवनवीन उपक्रमात सहभागी करून घ्यावे ही विनंती.

***- पालक- सौ.पूनम राहुल बागड***

स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम अत्यंत उत्कृष्ट आणि सुव्यवस्थित पद्धतीने पार पडला.संपूर्ण आयोजन छान नियोजनबद्ध होते. सहभागींचा उत्साह, कार्यक्रमातील विविध नृत्य, मांडणी आणि सर्व जबाबदार व्यक्तींचे सहकार्य उल्लेखनीय होते. कार्यक्रमाचे वातावरण प्रेरणादायी होते आणि प्रत्येक क्षण अर्थपूर्ण व आनंददायी बनला. या उत्तम आयोजनाबद्दल सर्व आयोजक, शिक्षक व सेवक वर्गाचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार. भविष्यातही असेच दर्जेदार आणि संस्मरणीय कार्यक्रम अनुभवायला मिळावेत हीच सदिच्छा. ***– पालक – सौ.मीना दत्तात्रय वाणी***

नुकताच शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि नियोजन पद्धतीने पार पडला. यंदाच्या स्नेहसंमेलनाची जागर महाराष्ट्रातील लोकनृत्याचा ही थीम ठेवण्यात आली होती. ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. या कार्यक्रमातून महाराष्ट्रातील विविध लोकनृत्यांचा सुरेख संगम पाहायला मिळाला. गवळण, लेझीम, गोंधळ,भारुड, पोवाडे, तारपा, बंजारा, कोळी, ईर इत्यादी  नृत्यांचे सादरीकरण लहानग्या मुलांकडून अत्यंत आत्मविश्वासाने व आनंदाने करण्यात आले. इतक्या लहान वयातील विद्यार्थ्यांकडून अशी तयारी करून घेणे हे शिक्षकांचे परिश्रम, नियोजन आणि विद्यार्थ्यांवरील विश्वास दर्शवतो. आजच्या धावत्या आणि बदलत्या युगात शाळेने लोकनृत्य सारखी पारंपारिक आणि संस्कृती जपणारी थीम निवडणे हे खऱ्या अर्थाने आपल्या सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याचे कार्य आहे. विशेष म्हणजे प्रत्येक लोकनृत्य सादर होण्यापूर्वी मुलांनाच प्रस्तावना सादर करण्याची संधी देण्यात आली. यामुळे केवळ नृत्यच नव्हे तर मुलांचा आत्मविश्वास,भाषिक कौशल्य आणि व्यासपीठावर बोलण्याची तयारी देखील विकसित झाली. कार्यक्रमात प्रत्येक मुलाला सहभागी करून घेण्यात आले. कोणी लहान नाही, कोणी मोठा नाही ही समतेची भावना प्रत्यक्ष कृतीतून रुजवण्यात आली. मला येत नाही, मी करणार नाही असा विचार कुठेही जाणवला नाही. हे शाळेच्या सकारात्मक वातावरणाचे मोठे यश आहे. या शाळेला एक उज्वल व मूल्याधिष्ठित इतिहास आहे. अनेक वर्षानंतरही आपल्या शाळेने तत्वांशी कधीही तडजोड न करता ती जपली आहेत, हे खरोखर कौतुकास्पद आहे. सुसंस्कृत, आत्मविश्वासू आणि जबाबदार पिढी घडविण्याचे कार्य या शाळेच्या माध्यमातून सातत्याने सुरू आहे. देशाला चांगले नागरिक कसे देता येतील याकडे शाळेचे विशेष लक्ष असल्याचे या कार्यक्रमातून प्रकर्षाने जाणवले. नराचा नारायण करणे हे संस्थेचे ध्येय या स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने साध्य होत असल्याचे स्पष्ट दिसून येते.या सुंदर, संस्कृती जपणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा उपक्रम घेतल्याबद्दल शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद आणि

सहकारी कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार ! – ***पालक – सौ.सारिका सुदाम महाजन***

आपल्या विद्यालयात ९ डिसेंबर रोजी आयोजित जागर लोकनृत्याचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.सदर कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाने खरंच खूप उत्कृष्टरीतीने केले होते. कार्यक्रमात आपल्या भारतीय संस्कृतीची पुरेपूर जपवणूक आणि विद्यार्थ्यांमध्ये आपली संस्कृती रुजावी हा उद्देश खरोखर उल्लेखनीय वाटला. कार्यक्रमाची थीम खरोखरच खूप सुंदर होते. सर्व शिक्षक वृंद एक दिलाने काम करत होते. तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांची सुद्धा सर्व पालकांना मदत होत होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शंखनाद ही संकल्पना सुंदर वाटली. प्रत्येक गाण्यात आपल्या हिंदू संस्कृती प्रमाणे मांडण्यात आलेली पूजा, रूढी, परंपरा याचा खरंच विद्यार्थ्यांवर नक्कीच चांगला प्रभाव पडेल व संस्कार होण्यास नक्की मदत होईल,यात कोणतीही शंका नाही. एकंदरीत कार्यक्रम अतिशय सुंदर व नियोजनबद्ध रीतीने पार पडला. धन्यवाद !

***– पालक – श्री. आर.एन. वाणी***

वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम तीनही विभागाचा एकत्र करणे हा निर्णय मला फार आवडला. त्यातल्या त्यात या सांस्कृतिक कार्यक्रमात खऱ्या अर्थाने संस्कृती जपली गेल्याचा भास झाला. लहान चिमुकल्यांपासून ते मोठ्या मुलांपर्यंत आपल्या लोकनृत्यांचा प्रभाव, वेशभूषा अगदी उठून दिसत होती. मुख्य म्हणजे कार्यक्रम बसवण्यात फक्त शिक्षकच नाही तर शिक्षकेतर कर्मचारी देखील सहभागी झाले होते, हे ऐकून खरंच आम्हाला आनंद वाटला. अभिमान वाटत होता की, आमची मुले अशा शाळेत शिकत आहेत .कार्यक्रमात सर्वच मुलांचा समावेश करून घेतला, कोणालाही वंचित राहू दिले नाही हे खरंच खूप छान काम संस्थेने व शाळेने केले होते.

***– पालक– सौ. ज्योत्स्ना सुनिल पाटील***

वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत यशस्वी आणि प्रभावी झाले. कार्यक्रमाची निवड,त्यांची मांडणी आणि एकूण सादरीकरण खूपच उत्कृष्ट होते. माझ्या मुलाने पोवाडा नृत्यात खूप छान भाग घेतला आणि त्याचा आत्मविश्वास वाढलेला दिसला. सर्व मुलांच्या उत्साहामुळे कार्यक्रमाला वेगळीच रंगत आली होती. या कार्यक्रमासाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या मेहनतीला तोड नाही. त्यांचे नियोजन आणि मुलांची तयारी कौतुकास्पद होती. कार्यक्रमाची संपूर्ण व्यवस्था उत्तम होती. आसन व्यवस्था, प्रकाशयोजना आणि वेळेचे नियोजन या व्यवस्था उत्तम होत्या. हा स्नेहसंमेलन सोहळा आमच्यासाठी अविस्मरणीय होता. पुन्हा एकदा सर्व शिक्षक आणि व्यवस्थापन मंडळाचे आभार !

***–पालक – सौ.अमृता निलेश लोहारकर***

९ डिसेंबर रोजी आयोजित केलेले स्नेहसंमेलन जागर लोकनृत्याचा हा विषय मला अतिशय आवडला. आपण आयोजित केलेले हे स्नेहसंमेलन मुलांमध्ये आणि समाजामध्ये विविध जातींच्या संस्कृतीची, नृत्य प्रकारची जनजागृती करण्याचे एक उत्तम साधन ठरले आहे. आपण याद्वारे विद्यार्थ्यांना या विविध जातींची ओळख करून दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. यापुढेही आपण अशाच उपक्रमांद्वारे मुलांना प्रोत्साहित कराल अशी मी आपल्याकडून अपेक्षा ठेवतो धन्यवाद !

*-पालक- श्री. दिलीप शिवाजी साठे*

जागर लोकनृत्याचा या कार्यक्रमाचे आपल्या शाळेने सुंदर आयोजन केले होते. सर्व शिक्षक वृंद व संस्थेचे पदाधिकारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. सर्व विद्यार्थ्यांनी अप्रतिम नृत्य करून कार्यक्रमाची शोभा वाढविली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला असून त्यांचे बुद्धी कौशल्य वाढविण्यास चालना मिळाली. उपस्थित मान्यवरांच्या मनोगतातून विद्यार्थ्यांना छान मार्गदर्शन मिळाले. याबद्दल सर्व शिक्षक वृंद व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे मनापासून अभिनंदन व आभार व्यक्त करतो.

*- पालक- श्री.प्रमोद विजय शिंपी*

दिनांक ९ डिसेंबर रोजी शाळेतर्फे पार पडलेल्या स्नेहसंमेलन कार्यक्रमाबद्दल अभिप्राय मांडताना अत्यंत आनंद होत आहे. कार्यक्रम खूप सुंदर व छान पद्धतीने साजरा झाला असून सर्वच विद्यार्थ्यांनी अत्यंत सुरेख नृत्य केले.त्यात सर्व शिक्षक, सेवक वर्ग यांनी घेतलेली मेहनत दिसून आली. खूप खूप धन्यवाद.असेच कार्यक्रम भविष्यात देखील होत राहो ही अपेक्षा.

*- पालक- श्री.कुणाल कुमावत*

शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन जे राजपूत मंगल कार्यालय येथे घेण्यात आले. हा कार्यक्रम खूपच चांगला आणि मुलांना प्रेरणा देणारा होता. मुलांना आदिवासी समाज, वंजारी समाज,श्रीकृष्ण, एकनाथ महाराज, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, खानदेशी संबळ, कोळीगीत, विठोबा महाराजांची दिंडी, लेझीम नृत्य,इत्यादी बद्दल व थोर पुरुषांबद्दल माहिती मिळाली. यातून मुलांना विविध समाजातील लोकनृत्याची देखील माहिती मिळाली. आम्ही सर्व पालक आपल्या सर्वांचे हा इतका सुंदर कार्यक्रम राबवला त्याबद्दल खूप आभारी आहोत. अशा कार्यक्रमांमधून मुलांना प्रेरणा मिळते. असे कार्यक्रम भविष्यात देखील व्हावे ही अपेक्षा.

*- पालक - श्री. गणेश सुभाष अग्रवाल*

मला वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम खूप खूप आवडला आहे या कार्यक्रमाचे नियोजन ही खूप

आवडले कारण अशा कार्यक्रमामधून आपण आपल्या मुलांना संस्कार तर देतो पण त्यांना जुन्या पारंपारिक परंपरेबद्दल जाणीव करून देऊन त्यांच्या ज्ञानात भर घालतो यातूनच आपण आपली संस्कृती घडवतो हा सुंदर कार्यक्रम घेतल्याबद्दल सर्व शिक्षक सेवक वर्गाचे मी मनापासून आभार व्यक्त करते.

***- पालक - सौ. प्रियंका विलास देवरे***

विविध समाजाची संस्कृती दाखवणारा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम खूप आवडला. कार्यक्रमाला आलेले प्रमुख पाहुणे डॉ.सौ. रूपालीताई राजपूत यांनी त्यांच्या मनोगतातून मी याच शाळेची विद्यार्थीनी आहे. याच शाळेत शिक्षण घेतले याबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले खूप आनंद वाटला. स्नेहसंमेलनात सर्व शिक्षकांनी मुलांकडून चांगला सराव करून घेतला. सर्व विद्यार्थ्यांनी छान नृत्य सादर केले याबद्दल शाळेचे आभार व्यक्त करते.

***- पालक - सौ. पूनम ईश्वर पाटील***

मातृ-पितृ पूजन दिवस हा अतिशय सुंदर उपक्रम शाळेने १४ फेब्रुवारी रोजी घेतला. एक पालक म्हणून मला गुरुकुल ट्रस्टचे व सर्व शिक्षक आणि सर्व कर्मचारी वृंद यांचे खूप खूप आभार मानावेसे वाटतात. कारण, १४ फेब्रुवारी हा दिवस प्रेम दिवस म्हणूनच आजवर शाळा, कॉलेज मध्ये साजरा होतो. पण खरंच, गुरुकुल ट्रस्टने अगदी आपल्या नावाप्रमाणे आपल्या विद्यार्थ्यांना संस्कार देण्यासाठी खूप मोलाचे कार्य या उपक्रमातून केले. यादिवशी सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या माता-पित्यांचे पाद्यपूजन केले. खरंच,डोळ्यात पाणी आले. कारण, आजकाल संस्कारहीन होत चाललेल्या नवीन पिढीला जर आपण शाळेतूनच असे सुंदर,छान संस्कार दिले तर नक्कीच आपली उद्याची भावी पिढी खूप संस्कारमय होईल.यातून आपल्या भारताची महान संस्कृती लोप होण्यापासून वाचेल. पुन्हा एकदा शाळेचे व सर्व शिक्षकांचे अभिनंदन आणि आभार

***-पालक - श्री. राहुल भास्कर सोनार***

आनंद मेळाव्यात विद्यार्थी आणि पालकांना खाद्यपदार्थांचे स्टॉल लावण्याची संधी दिली त्याबद्दल शाळेचे आभार मानते. अशा उपक्रमामुळे मुलांना व्यावहारिक ज्ञान मिळते. प्रत्यक्ष व्यवहार करताना विचार करण्याची क्षमता वाढते. वागणे, बोलणे हे देखील समजते. स्वतः पैसे खर्च करण्याचा आनंद अनुभवता येतो. पालकांना देखील आपले पदार्थ इतरांना खाऊ घालण्याची संधी मिळते याबद्दल शाळेचे धन्यवाद.

***-पालक - सौ. जयश्री शशांक अहिरे***

दिनांक २५ फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेल्या तयार केलेल्या कलाकृती यांचे हस्तकला प्रदर्शन अतिशय चांगल्या पद्धतीने भरवले गेले.त्यांच्या लहान वयात त्यांच्याकडे असलेल्या कलागुणांना प्रोत्साहित करून त्यांच्यातील एक उत्तम कलाकार घडावा या दृष्टीने घेतलेला हा उपक्रम खूप छान होता.या प्रदर्शनाचा भविष्यात नक्कीच फायदा होईल. याबद्दल सर्वांचे कौतुक करतो.

***– पालक – श्री. दिपक विजयराव पाटील***

शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान नसून मुलांच्या कल्पना, भावना जपणारे सोबत आनंददायी अनुभव देणारे असावे. आजच्या कलाप्रदर्शनाने हे ठळकपणे उमटलेले दिसले. अगदीच उत्तम नसले तरी आनंद देणारी कलाकृती मनाला भावली. आपल्या उपक्रमाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. पुन्हा एकदा पाल्यांच्या आनंदासाठी सर्वांचे धन्यवाद.

**– पालक – श्री. शरद पंडीत पाटील**

आपली शाळा ही संस्कार मूल्य रुजवणारी शाळा आहे. पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण न करता शाळेने १४ फेब्रुवारी रोजी मातृ–पितृ पूजन करून मुलांवर खूप छान संस्कार केलेला आहे. त्यामुळे मला या शाळेबद्दल खूप समाधान वाटते. शाळेच्या सर्व शिक्षकांचे व मुख्याध्यापकांचे मनापासून आभार. असेच नवनवीन उपक्रम शाळेने आयोजित करावे त्यासाठी खूप खूप शुभेच्छा. धन्यवाद !

***– पालक – सौ. पद्मावती प्रकाश शेटे***

## सुभाषितः विद्या विनयेन शोभते।

**अर्थः विद्या विनयशीलतेमुळे अधिक सुंदर दिसते.**
**ज्या व्यक्तीकडे ज्ञान आहे आणि तो विनम्र आहे, त्याची समाजात अधिक किंमत होते.**

## सुभाषितः उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।

**अर्थः कोणतेही काम केवळ इच्छा केल्याने पूर्ण होत नाही,**
**तर त्यासाठी प्रयत्न आणि परिश्रम करावे लागतात.**

## ✻ श्रद्धांजली ✻

दु:ख दुसऱ्यांचे जाणून घ्यावे । ऐकून तरी वाटून घ्यावे । बरे वाईट सोसावे समुदायाचे । देशाच्या रक्षणासाठी शहीद झालेल्या वीर जवानांना आणि भारतातील व महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, राजकय, सांस्कृतिक, कला व तळागाळातील क्षेत्राचा विकास घडविणाऱ्या सहकार क्षेत्रातील दिवंगत झालेल्या थोर व्यक्ती, अपघात-नैसर्गिक आपत्तींमुळे प्राणास मुकलेल्या व्यक्तींना आम्ही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

## ✻ ऋणनिर्देश ✻

वर्षभरात विविध शालेय व सहशालेय उपक्रम राबवितांना अनेकांचे अनमोल सहकार्य लाभले. पालक, हितचिंतक व संस्थेचे पदाधिकारी यांनी सुध्दा वेळोवेळी सहकार्य केले.

ज्या विद्यार्थ्यांच्या वाढदिवस निमित्त शाळेच्या वाचनालयास त्यांच्या पालकांनी पुस्तक रुपाने भेट दिली तसेच ज्या ज्ञात अज्ञात व्यक्तींनी शाळेला मदत व अनमोल सहकार्य केले,त्याबद्दल या सर्वांचे ऋणी राहून भविष्यातही अशाच प्रेमाची व सहकार्याची अपेक्षा व्यक्त करते.

**सौ. संगीता प्रमोद सपकाळे**
मुख्याध्यापक
हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालय,चाळीसगाव